# हिंगोली जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय,हिंगोली.

## दिनांक २७.०१.२०२३

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि. २६/०१/२०२३ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या २१५ वाहन चालका विरूध्द कार्यवाही करण्यात आली असुन त्यांचे कडुन २,२४,८५०/— रूपये दंड वसुल करण्यात आला आहे.

**दारूबंदी सदराखाली विशेष मोहित अंतर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैध दारू विक्री अंतर्गत दि. २६/०१/२०२३ रोजी दारूबंदी कायदया अंतर्गत हिंगोली जिल्हयामध्ये एकुण ०१ ठिकाणी छापा मारूण कार्यवाही करून आरोपीतांनकडुन ०२.०५ लिटर दारू असा एकुण ८८०/—रू.किमतीचा मुददेमाल जप्त करण्यात आला असुन आरोपीतां विरूध्द दारूबंदी कायदयाअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**रेशनचा गहु तांदुळ काळयाबाजारात जाण्याआधी पोलीसांचा छापा:—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये दि. २६/०१/२०२२ रोजी पोस्टे सेनगाव येथे कलम भादवी कलम ३/७ जिवनावश्यक वस्तु अधी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असुन यातील आरोपीने बेकायदेशीर रित्या शासनाकडुन गोर गरीब लाभार्थ्यांना कमी किंमतीत दिला जाणारा राशनचा गहु स्वत:चे फायद्यासाठी जास्त दारात चोरटी विक्री करण्यासाठी घेवुन जात असतांना चारचाकी वाहण क्र. एम.एच.२१ बिच ५१८९ मध्ये गहु तांदुळ आसा राशनचा कि.१२०,५४८ रू माल मिळुन आला म्हणुन गुन्हा दाखल करण्यात आला आहे व पुढील तपास सेनगाव पोलीस करित आहेत.

**दुखापत दाखल गुन्हे:—**

दि. २६/०१/२०२३ रोजी पोस्टे हिंगोली शहर येथे ०१ गुन्हा कलम ३२४ भादवी कलमान्वये दाखल असुन या संदर्भात पोलीस तपास करित आहेत.